अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. १५ डिसेंबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ७६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## मुख्यमंत्र्यांचे आश्वासन; १७ लाख सरकारी कर्मचाऱ्यांचा संप मागे

✔ **नागपूर** : जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत निवेदन देत आश्वासन दिले. यावेळी संप मागे घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर आता सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप मागे घेण्यात आला आहे.

कर्मचारी संघटनांनी मुख्यमंत्र्यांनी सभागृहात घोषणा करावी, अशी मागणी केली होती. तसेच संप स्थगित करण्यास नकार दिला होता. गुरुवारी राज्यभरातील १७ लाख कर्मचारी संपावर होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत जुन्या पेन्शनबाबत निवेदन केल्यानंतर कर्मचारी संघटनांच्या समन्वय समितीची बैठक झाली. त्यानंतर हा संप स्थगित झाल्याची घोषणा करण्यात आली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान सरकारची भूमिका मांडली असून यासंदर्भातील अंतिम निर्णय अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेतला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे.




शासनाला प्राप्त झालेला अहवाल व त्यावरील चर्चा आणि अंतिम निर्णय हा या तत्वाशी सुसंगत असेल. त्यामुळे या अहवालावर अंतिम निर्णय येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात दिली. यावेळी संप मागे घेण्याचे आवाहनही केले होते.

## ऐतिहासिक पाऊल...

# सायबर, ई-क्राईमला बसणार लगाम

### ▪ बँकांसह कार्पोरेट संस्थांना दिलासा
### ▪ डीएसएसपी यंत्रणा लवकरच कार्यान्वित




✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्याच्या गृह खात्याने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. सायबरचे आव्हान पेलणे आणि ई क्राईमची डोकेदुखी पोलीस दलापुढे वाढत आहे. त्याचा विचार करून गृह विभागाने आगामी काळात 'सायबर' आव्हान पेलण्यासाठी व 'ई-क्राइम' कमी करण्याकरिता राज्यात जागतिकस्तराचा 'डायनॅमिक सायबर सिक्युरिटी प्लॅटफॉर्म' (डीएसएसपी) तयार करण्यात येणार आहे. एप्रिल २०२४ पर्यंत ही यंत्रणा कार्यान्वित होईल. त्यानंतर सायबर आणि सोशल गुन्हेगारीसाठी प्रत्येक वेळी केंद्र सरकारची मदत घेण्याची गरज भासणार नाही.**

उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही महत्वाची माहिती गुरूवारी नागपूर येथे दिली. महाराष्ट्रातील सायबर पोलीस ठाण्यांची सध्या बेताची आहे. सद्य:स्थिती पोलीस विभागातील सर्वसामान्य अधिकारी, कर्मचाऱ्यांनाच 'सायबर सेल'मध्ये बदलीवर पाठविण्यात येते. परंतु भविष्यात तसे होणार नाही. पोलीस दलातील सर्वांत तरूण अधिकारी, कर्मचाऱ्यांची छाननी करून त्यातील 'टेक्नोसॅव्ही' लोकांची निवड करण्यात येईल. त्यांना 'सायबर क्राइम' हाताळण्याचे शास्त्रयुद्ध तांत्रिक प्रशिक्षण दिले जाईल, असे फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्रातील 'डायनॅमिक सायबर सिक्युरिटी प्लॅटफॉर्म'साठी जगातील १७ सर्वांत आघाडीच्या सायबर कंपन्यांनी सरकारकडे प्रस्ताव सादर केले आहेत. राज्यात हा सायबर प्लॅटफॉर्म तयार झाल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व राष्ट्रियीकृत व खासगी बँका, सगळ्या शासकीय व



**प्रचलित पद्धत बदलणार :** फडणवीस यांनी सांगितलं की, सायबर विषयक गुन्ह्यात एखादी तक्रार महाराष्ट्रातील एखाद्या शहरातून आली की राज्यस्तरावर येते. त्यानंतर ती राज्याकडून केंद्र सरकारच्या 'इंडियन कॉम्प्यूटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम'ला कळविली जाते. 'सर्ट' ज्या देशात सर्व्हर असेल तिथे माहिती देते. अशात त्या देशात 'विकेंड'ची सुटी असेल तर गुन्ह्यांचा छडा लावण्यात विलंब होतो. परिणामी अनेकदा गुन्ह्यांची गंभीरता वाढते व प्रसंगी जातीय दंगलीही होतात. नव्या प्लॅटफार्ममुळे हा त्रास कमी होणार आहे.

**भविष्यात 'डेटा'ला मोठी किंमत :** सायबर आणि कृत्रिम बुद्धीमत्ता अर्थात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचे महत्व आता वाढत जाणार आहे. अशात हॅकिंग, फेक पोस्ट, फेक फोटो आणि डेटा यांना जागतिकस्तरावर मोठी किंमत मिळणार आहे. भविष्यात कच्चे तेल, हिरे, सोने आणि खनिज संपत्तीपेक्षाही डेटाची किंमत जास्त राहणार आहे. या डेटाच्या आधारावर कुणी काहीही करू शकेल, अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. अमेरिकेतील नुकतीच झालेली निवडणूक त्याचे उत्तम उदाहरण आहे. तेथे मतदारांचा डेटा चोरण्यात आला. त्याच्या आधारावर प्रचाराचे प्रोफाइल तयार करण्यात आले. त्यामुळे डेटा सुरक्षेचा मुद्दाह प्राधान्यावर राहणार आहे.

वित्तीय संस्था, व्हॉट्सअॅप, फेसबुक, ट्विटर (एक्स), इन्स्टाग्राम, टेलिग्राम, शेअरचॅट, स्नॅपचॅट आणि सर्वच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म त्याला जोडले जाणार आहेत. या सर्वांवर २४ तास ३६५ दिवस नजर ठेवली जाणार आहे, असं फडणवीस यांनी सांगितले. सध्या महाराष्ट्रात कुठेही आर्थिक फसवणूक झाली तर पैसा आपल्या देशातील पाच ते सहा बँकांमध्ये फिरून विदेशातील अशा एखाद्या देशातील बँकेच्या खात्यात जमा होतो, ज्याच्याशी भारताचा कोणताही करार झालेला नाही. त्यामुळे तेथे तपास करता येत नाही आणि पैसाही परत आणता येत नाही अशी परिस्थिती आहे. नवीन प्लॅटफॉर्म तयार झाल्यानंतर प्रत्येक सायबर गुन्ह्यांबाबत 'रिस्पॉन्स टाइम' कमी होईल.

---

## भैरवनाथ कारखान्याकडे ऊस घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टर चालकांना मारहाण

**कुर्डूवाडी-टेंभुर्णी रोडवरील पिंपळनेर शिवारात घटना**

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

भैरवनाथ साखर कारखान्याकडे गाळपासाठी उस घेऊन निघालेल्या तिघा ट्रॅक्टर चालकांना अडवून १० ते १२ जणांनी काठीने मारहाण केली. ही घटना दि. १३ रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास कुर्डूवाडी-टेंभुर्णी रोडवर पिंपळनेर (माढा) शिवारातील ओढ्याजवळ घडली.

कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात ट्रॅक्टर चालक अण्णासाहेब अंकुश नवले (दारफळ सीना, माढा) यांनी फिर्यादी दिली आहे. अनोळखी १२ जणांवर कुर्डूवाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला.

यातील फिर्यादी अण्णासाहेब नवले (अंजनगाव उमाटे, माढा) येथून रात्री पाटील यांच्या शेतातील उस (एम. एच. ४५ ए. क्यू. ६०७३) ट्रॅक्टरमधून गाळपासाठी भैरवनाथ शूगर कारखाना (आलेगाव, माढा) येथे घेऊन निघाले असता रात्री ११.३० वाजता सुमारास कुर्डूवाडी टेंभुर्णी रोडवरील पिंपळनेर शिवारातील ओढ्याजवळ तोंडावर बांधलेले १० ते १२ अनोळखी इसम फिर्यादीच्या पुढे असणाऱ्या दोन ट्रॅक्टर चालकांना फायबरच्या काठीने मारत होते. फिर्यादीचा ट्रॅक्टर पाहताच सर्व इसम फिर्यादीकडे आले, ट्रॅक्टर बाजूला घेण्यास सांगितले.

ट्रॅक्टर बाजूला घेताच एकाने विचारले की, कोणत्या कारखान्याला उस वाहतूक करतो. त्यावर फिर्यादींने भैरवनाथ असे सांगितल्यावर इतर इसमांनी फायबर काठीने मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाण करीत असताना पळून जाण्याचा प्रयत्न केला असता, पाठलाग करुन मारहाण केली आणि जखमी केले. त्यानंतर ते तिथून निघून गेले.

फिर्यादीने त्याच्या आधी मारहाण झालेल्या ट्रॅक्टर चालक रंजीत जालिंदर उंडे (उंडेगाव, बार्शी), अतिश सत्यवान चव्हाण (जामगाव, माढा) यांना मारहाणीबाबत विचारले असता कोणत्या कारखान्याला उस वाहतूक करतो, यावर भैरवनाथ शूगर (आलेगाव) असे सांगितल्यावरुन मारहाण केल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, काही वेळातच कुर्डुवाडी पोलिस ठाण्याची गाडी आली. पोलिसांनी ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी आणले.



## वाहन मागे घेण्यावरून वाद; कारची काच फोडली

**कुर्डूवाडीत चौघांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल**

✔ सुराज्य/कुर्डूवाडी



कुर्डूवाडी शहरात रस्त्याचे काम सुरू असताना वाहतूक कोंडी झाल्याने मोटरसायकलसमोर कार आल्यानंतर गाडी मागे घेण्याच्या कारणावरून वाद झाल्यानंतर एकाने चारचाकी कारची काच फोडली.

याबाबत चौघांविरुद्ध कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलीस नाईक सागर सुरवसे यांनी फिर्याद दाखल केली. कुर्डूवाडी नगरपरिषदेचे रस्त्याचे काम सुरू आहे. त्यामुळे रेल्वे स्टेशन चौक ते महात्मा ज्योतीबा फुले विद्यालयाच्या गेटदरम्यान वाहनांची गर्दी होऊन ट्रॅफिक जाम झाल्याने टिळक चौक येथे वाहतूक पोलीस सागर सुरवसे वाहतूक सुरूळीत करीत होते. त्यावेळी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास ओळखीचे आकाश जगताप, सिध्दार्थ झिंगळे, विजय देवकते (रेल्वे कॉलनी,कुर्डूवाडी) हे त्यांच्या टू-व्हीलर गाड्यांवरून नगरपालिका दिशेने निघाले होते. यावेळी पांढ-या रंगाची किया कंपनीची (एम. एच.१२जे.यु. २७७६) कार आली होती. गाडी कोण मागे घेणार यावरुन मोटरसायकलवर आलेले आकाश जगताप, सिध्दार्थ झिंगळे, विजय देवकते, कार चालक यांच्यामध्ये वाद झाला. त्यावेळी सिध्दार्थ झिंगाळे याने दगड हातात घेऊन कारचे मागील काच फोडून नुकसान केले. त्याकारणावरून त्यांनी टिळक चौक येथे सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर शांतता भंग करून हाताने एकमेकांना मारहाण केली.

## सोलापूर-धाराशिव रेल्वे मार्गातील बाधित शेतकऱ्यांना नोटिसा

**साठ दिवसात कागदपत्रे जमा करा; जानेवारीमध्ये भुसंपादन**

✔ सुराज्य/सोलापूर

राज्यातील बहुचर्चित सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वे मार्गाचे काम गतीने करण्याची प्रक्रिया प्रशासनाच्या वतीने चालू आहे. हा रेल्वे मार्ग जाणाऱ्या चार गावातील बाधित शेतकऱ्यांना प्रशासनाच्या वतीने नोटीसा पाठवल्या आहेत. ६० दिवसात कागदपत्रे भूसंपादन कार्यालयाकडे जमा करण्याचे आवाहन आवाहन भूंपादन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रावण क्षीरसागर यांनी केले आहे. जानेवारी मध्ये भूसंपादन प्रक्रिया चालू केली जाणार आहे.




नव्याने साकारण्यात येणाऱ्या ब्रॉडगेज रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाने आपल्या हिस्याचे पैसेही मंजूर केले आहेत. यामुळे हा रेल्वेमार्ग आता लवकरच म्हणजे जानेवारीपासून सुरू करण्याची तयारी रेल्वेच्या संबंधित यंत्रणेकडून सुरू झाली आहे. दोन दिवसांपूर्वीच तुळजापूरचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनीही रेल्वेच्या संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठक घेऊन या प्रकल्पाचा नारळ फोडण्याचे आवाहन केले आहे. हा मार्ग तयार झाल्यावर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विकासाची गंगा वाहणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील होनसळ, देगाव, सेवालालनगर, बाणेगाव या चार गावच्या शेतकऱ्याना या नोटिसा मिळाल्या आहेत. उर्वरित सहा गावच्या नोटिसाही लवकरच निघणार आहेत. रेल्वे मार्गामुळे महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राला, पर्यटन क्षेत्राला, उद्योग जगताला मोठी उभारी मिळणार आहे. या चर्चित मार्गावर सोलापूर, खेड, मार्डी, तामलवाडी, माळुंब्रा, रायखेल, वडगाव, तुळजापूर, सांजा, धाराशीव अशी दहा रेल्वे स्टेशन राहणार आहेत. पुढील महिन्यात प्रत्यक्षात भूसंपादनाच्या कामाला सुरुवात होणार आहे. हा दोन विभागाला जोडणारा रेल्वे मार्ग सोलापूर जिल्ह्यातील बाळे, केगाव, भोगाव, गुळवंची, कारंबा, बाणेगाव, मार्डी, सेवालालनगर, होनसळ तर तुळजापूर तालुक्यातील वडगाव, काटी, तामलवाडी, गंगेवाडी, सुरतगाव, सांगवी काटी, गोंधळवाडी, माळुंब्रा, कदमवाडी, सारोळा, रायखेल, हंगरगा, मंगरूळपाटी, तुळजापूर, तडवळा, बोरी, बावी, वडगाव, पळसवाडी, देवळाली, शेखापूर, धाराशिव, सांजा, जहाँगीरदारवाडी या गावांमधून जाणार आहे.

---

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**त्यांनी असे पाउल का उचलले,हे पण पाहिले पाहिजे !**


कल्याण
**120-38-224**

मुंबई
**346-32-660**


## हडपसर-दिवे घाट रस्ता चौपदरी होणार

### पालखी मार्गावरची वाहतूक कोंडीची समस्या सुटणार

✔ सुराज्य/पुणे

पालखी महामार्गावरील हडपसर ते दिवे घाट या अंतराचे चौपदरीकरण आणि दुरुस्तीसाठी केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्रालयाने ७९२.३९ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

खासदार सुप्रिया सुळे यांनी ही माहिती दिली असून आपल्या पाठपुराव्याला प्रतिसाद देत निधी मंजूर केल्याबद्दल केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नीतीन गडकरी यांचे आभार मानले आहेत. हडपसर ते दिवे घाट या पालखी महामार्गावर सातत्याने वाहतूक कोंडी तसेच रस्त्यावरील खड्ड्यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागते. याशिवाय घाट भाग हा वन विभागाच्या हद्दीत असल्याने रुंदीकरणास अडथळे येत होते. या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे या सातत्याने या रस्त्याच्या कामासाठी केंद्रीय महामार्ग मंत्रालयाकडे पाठपुरावा करत होत्या. खासदार शरद पवार








यांनीही याबाबत केंद्राकडे शब्द टाकला होता. त्याला अपेक्षित यश आले असून नुकतेच काही दिवसांपूर्वी निविदा काढण्याचे आदेश देण्यात आले. त्यावेळी ३९९.०२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यात आता वाढ करण्यात आली असून ७९२.३९ इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीसाठी खासदार सुळे यांनी गडकरी यांचे आभार मानले असून हे काम पूर्ण झाल्यावर हडपसर ते दिवे घाट या मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या बऱ्याच अंशी दूर होणार आहे, असे त्यांनी म्हटले आहे. या मार्गावरुन संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी जाते. हा पालखी सोहळा देखील अतिशय उत्तम पद्धतीने पार पडू शकेल, असेही त्यांनी पुढे नमूद केले आहे. हडपसर ते दिवे घाट या पालखी महामार्गावर सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याने वाहनचालकांना कसरत करावी लागत होती. त्यामुळे या रस्त्याच्या चौपदरीकरणाची मागणी सातत्याने होत होती. खासदार सुप्रिया सुळे यांनी या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी रस्ते वाहतूक मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता.

## गोंधळ घातल्याबद्दल १५ खासदार निलंबित

✔ **नवी दिल्ली** : संसदेच्या सुरक्षेच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांनी गुरूवारी संसदेत जोरदार हंगामा केल्यानंतर आता त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. लोकसभेच्या १४ आणि राज्यसभेचा एक अशा एकूण १५ खासदारांचे निलंबन करण्यात आले. हे निलंबन संसदेचे अधिवेशन सुरू असेपर्यंत असणार आहे.

संसदेच्या सुरक्षा व्यवस्थेत झालेल्या चुकीबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निवेदन द्यावे अशी मागणी विरोधी पक्षांच्या खासदारांनी केली. त्यावेळी संसदेत मोठा गोंधळ निर्माण झाला.

**या खासदारांच निलंबन**

- टीएन प्रथापन, काँग्रेस
- हीबी एडेन, काँगेस
- जोथिमनी, काँग्रेस
- राम्या हरिदास, काँग्रेस
- डीन कुरियाकोस, काँगेस
- बेनी बेहनन, काँग्रेस
- वी के श्रीकंदन, काँग्रेस
- मोहम्मद जावेद, काँग्रेस
- पीआर नटराजन, माकप
- कनिमोई करुणानिधि, द्रमुक
- के सुब्रमण्यन
- पारथीबान, डीएमडीके
- एस वेंकटेशन, माकप
- मणिकम टैगोर, काँग्रेस

या प्रकरणानंतर संसदेच्या कामकाजात अडथळा आणल्याबद्दल या १५ खासदारांचे निलंबन केल्याचं अध्यक्षांनी जाहीर केले.